दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक १३० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.३ ऑगस्ट २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## पोलिसांच्या सर्वसाधारण बदल्या गुरुवारपर्यंत होणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोरोनाचा प्रादुर्भाव आणि अतिवृष्टीमुळे लांबलेल्या पोलीस उपनिरीक्षक ते निरीक्षक दर्जाच्या सर्वसाधारण बदल्या येत्या गुरुवारपर्यंत होणार आहेत. पोलीस मुख्यालयातून त्याबाबतचे आदेश काढण्यात येणार आहेत.प्रभारी पोलीस महासंचालक संजय पांडे यांनी रविवारी आपल्या फेसबुक अकाउंटवरून त्याबाबत माहिती दिली आहे. उपाधीक्षक ते वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या मात्र १४ ऑगस्टपूर्वी केल्या जातील, गृह मंत्रालयातून त्याबाबतचे आदेश काढण्यात येणार आहेत. सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या २५ टक्के बदल्या करण्याबद्दल सामान्य प्रशासन शुक्रवारी अध्यादेश काढले आहेत. त्यानुसार ११ बढत्यासह जवळपास ५० आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या होतील. राखीव पोलीस दलातील बदल्या सोमवारी तर त्यानंतर दोन दिवसांत हवालदारांना पदोन्नती दिली जाईल. वायरलेस, श्वानपथक, परिवहन विभागातील अंमलदारांच्या विनंतीवरून करण्यात येणार आहे. त्यानंतर नि:शस्त्र दलातील पीएसआय, एपीआय व पीआयच्या बदल्या गुरुवारपर्यंत करणार असल्याचे पांडे यांनी जाहीर केले आहे.

# परंपरा संघर्षाची, वज्रमूठ निर्धाराची या सुत्राचा वापर करणार : आ. बाळाराम पाटील

## शेतकरी कामगार पक्षाचा ७४ वा वर्धापनदिन उरणमध्ये साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण - पनवेलमध्ये शेकापचे वर्चस्व पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी आता परंपरा संघर्षाची, वज्रमूठ निर्धाराची या सुत्राचा वापर करण्याची घोषणा कोकण शिक्षक मतदार संघाचे आ. बाळाराम पाटील यांनी उरण येथे आयोजित करण्यात आलेल्या ७४ व्या वर्धापन दिनानिमित्ताने केली. शेतकरी कामगार पक्षाचा ७४ वा वर्धापन दिन उरण येथील एसएसपी इंटरनॅशनल स्कूल फुंडे येथील सभागृहात आयोजित करण्यात आला होता.




विधान सभा निवडणुकीत पनवेल–उरण मध्ये विधानसभा निवडणुकांच्यात उमेदवारांची हार, कर्नाळा बँक प्रकरणामुळे झालेली पक्षाची बदनामी या पार्श्वधभूमीवर शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांच्यात एक प्रकारची मरगळ दिसून येत होती. परंतु सोमवार दिनांक २ ऑगस्ट रोजी उरणच्या द्रोनागिरी नोड येथे झालेल्या शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापनदिन मेळाव्यात ही मरगळ झटकून शेकाप कार्यकर्ते नवचैतन्याच्या ऊर्मीने पुन्हा कामाला लागल्याचे चित्र दिसत होते. कोरोना कालावधीतील प्रतिबंध ध्यानात घेता केवळ दोनशे कार्यकर्त्यांच्यात सामाजिक अंतर राखून वर्धापन दिन सोहळा पार पाडण्याचे ठरविण्यात आले होते. त्यामुळे निवडक पदाधिकारी आणि मुख्य कार्यकर्ते यांना आमंत्रित करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे सुरुवातीला शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते, ११ वेळा एकाच पक्षाच्या झेंड्यावर एकाच मतदारसंघातून निवडून जाणारे विक्रमवीर भाई गणपतराव देशमुख अर्थात आबासाहेब यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. गणपतराव देशमुख यांच्या निधनाचा दुखवटा असल्यामुळे शेतकरी कामगार पक्षाचा लाल बावटा अर्ध्यावरती उतरवण्यात आला होता. सुरेश पाटील यांनी मागच्या वर्धापन दिनापासून शेकाप च्या उरण आणि पनवेल मतदारसंघातील निधन पावलेल्या कार्यकर्त्यांच्या शोक संदेशाचा प्रस्ताव मांडला. त्यानंतर निलेश म्हात्रे यांनी विविध क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव वाचला. उरणचे तालुका चिटणीस मेघनाथ तांडेल यांनी प्रास्ताविकातून अत्यंत आक्रमक पणे आपले विचार मांडले. त्यांच्या भाषणाने कार्यकर्त्यांच्यात आवेश दिसून आला.



आपले मनोगत व्यक्त करताना आमदार बाळाराम पाटील म्हणाले की, जशी आषाढी एकादशीला पांडुरंगाच्या भेटीची ओढ वारकरी संप्रदायाला लागते आणि ते वारीमध्ये सहभागी होतात तशीच ओढ शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्याला वर्धापनदिन मेळाव्याची लागलेली असते. कोरोनाविषाणू च्या प्रादुर्भावामुळे मागच्या वर्षी वर्धापन दिन सोहळा होऊ शकला नाही. कार्यकर्त्यांना मरगळ झटकून उर्मी देता यावी या उद्देशाने आम्ही जिल्हा चिटणीस यांच्या परवानगीने पनवेल–उरण विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांकरता वर्धापनदिन सोहळ्याचे मिनी रूप आयोजित करण्याचे ठरविले.

नवी मुंबई विमानतळ नामांतराच्या वादाबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना आमदार बाळाराम पाटील म्हणाले की, धूर्त राजकारण्यांनी कावेबाज पद्धतीने केलेले हे राजकारण आहे. आगामी पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुकांना सामोरे जाताना विरोधकांकडे कुठलाही मुद्दा शिल्लक राहिला नसल्याकारणाने त्यांनी हा अनाठाई मुद्दा उचलून धरला आहे. आज नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दी बा पाटील यांचे नाव लाभले तर सगळ्यात जास्त आनंद शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्याला होईल. महाविकास आघाडीची भूमिका ठरवण्यापूर्वी विरोधकांनी पद्धतशीरपणे आंदोलन हायजॅक केले. वास्तविक नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि बा पाटील साहेब यांचे नाव देण्याबाबत भारतीय जनता पक्षात एकमत नाही. आज नवी मुंबई विमानतळ साठी नावाचे राजकारण करणाऱ्यांनी त्यांच्या पक्षाची भूमिका जनतेसमोर मांडावी.

वर्धापनदिन मेळाव्याला आमदार बाळाराम पाटील, अॅड आस्वाद पाटील, पनवेल नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे, पनवेल विधानसभा मतदार संघाचे अध्यक्ष काशिनाथ पाटील, पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष योगिता पारधी, माजी तालुका चिटणीस नारायण शेठ घरत, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र पाटील, पनवेलचे तालुका चिटणीस राजेश केणी, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती डॉक्टर दत्तात्रय नागो पाटील, पनवेल महानगरपालिका जिल्हा चिटणीस नगरसेवक गणेश कडू,पनवेल महानगरपालिका जिल्हा महिला आघाडी प्रमुख अनुराधा ठोकळ यांच्यासह पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य, नगरसेवक, सरपंच, उपसरपंच,जिल्हा चिटणीस मंडळातील निवडक सदस्य उपस्थित होते.

## संक्षिप्त...

### वकिलासंह कोर्टातील क्लार्कना मुंबई लोकलमधून प्रवासाची मुभा

**दै.रायगड नगरी । मुंबई**


मुंबई लोकल कधी सुरु होणार? याकडे सर्व मुंबईकरांचं लक्ष लागलं असताना आता वकिलांना आणि हायकोर्टातील क्लार्कना लोकल प्रवासाची मुभा देण्यात आली आहे. वकिलांचाही फ्रंट लाईन वर्करमध्ये समावेश करण्यात आला आहे. आता वकील आणि कोर्टातील क्लार्कना मुंबई लोकलमधून प्रवासाची मुभा देण्यात आली आहे. लसीकरण पूर्ण झाल्याचं प्रमाणपत्र वकील संघटनेकडे देणं अनिवार्य आहे. त्यानंतर संघटना वकिलांना पासच्या मंजुरीसाठी प्रमाणपत्र देणार आहे. हे प्रमाणपत्र दाखवून तिकीट विंडोवर केवळ पास दिला जाईल, दैनंदिन तिकीट मिळणार नाही, अशी माहिती महाधिवक्त्यांनी हायकोर्टात दिली आहे.

यावेळी मात्र सर्वसामान्य जनतेचं काय? असा सवाल हायकोर्टानं केला. लस घेतल्यांना जर घरात बसावं लागतं असेल तर लसीकरणाचा उपयोग काय? असंही हायकोर्टानं म्हटलं आहे. लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या सर्वांना लोकल प्रवासाची मुभा देण्याचा सरकारचा मानस आहे, असंही महाधिवक्ता म्हणाले. सध्या चर्चगेट ते दहीसर प्रवास करायला किमान ३ तास लागत आहेत. सर्वसामान्यांचाही गांभीर्यानं विचार करा, असं हायकोर्टानं म्हटलं. गुरूवारपर्यंत यावर भूमिका स्पष्ट करू, असं आश्वासन महाधिवक्त्यांनी कोर्टात दिलं. वकीलांचाही अत्यावश्यक सेवेत समावेश करून लोकल ट्रेननं प्रवास करण्याची मुभा द्या, अशी मागणी करत काही वकीलांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सगळ्याच वकिलांकडे स्वतःचे खाजगी वाहन नसल्याने मुंबईतील उपनगरांत राहणाऱ्या वकिलांना लोकल ट्रेनने प्रवास करण्याची मुभा द्यावी, अशी मागणी या याचिकेतून करण्यात आली होती.

## आदेश जारी; राज्यातील २२ जिल्ह्यांमध्ये निर्बंध शिथील

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात करोना संसर्गाची दुसरी लाट नियंत्रणात येत असल्याने अखेर निर्बंधांमध्ये शिथीलता देणारा मोठा निर्णय झाला आहे. ब्रेक द चेन अंतर्गत सुधारित आदेश महाराष्ट्र सरकारने जारी केला असून २२ जिल्ह्यांना निर्बंधांमधून मोठ्या प्रमाणात सूट देण्यात आली आहे. त्याचवेळी मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि ठाणे या तीन जिल्ह्यांत स्थानिक आपत्ती व्यवस्थापन विभाग निर्णय घेईल असे स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, कोविड पॉझिटिव्हिटी रेट जास्त असलेल्या आणि दैनंदिन रुग्णसंख्या अधिक असलेल्या ११ जिल्ह्यांमध्ये लेव्हल तीनचे निर्बंध कायम ठेवण्यात आले आहेत.



ब्रेक द चेन अंतर्गत जारी करण्यात आलेला सुधारित आदेश तत्काळ प्रभावाने लागू करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज सांगली येथे पत्रकारांशी बोलताना निर्बंधांबाबत माहिती दिली होती. शिथीलता देण्याबाबत आजच आदेश निघेल असे ते म्हणाले होते. त्यानुसार राज्याचे मुख्य सचिव सीताराम कुंटे यांनी सुधारित आदेश जारी केला आहे. या आदेशामुळे कोविडच्या पहिल्या लाटेनंतर दुसऱ्या लाटेतही निर्बंधांच्या बेडीत अडकलेल्या नागरिकांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळणार आहे. ज्या जिल्ह्यात कोविड पॉझिटिव्हिटी रेट जास्त आहे त्या जिल्ह्यांना तूर्त दिलासा मिळाला नसला तरी अर्ध्यापेक्षा जास्त म्हणजे ३६ पैकी २२ जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणात निर्बंध शिथील करण्यात आले आहेत. त्यात मुंबई आणि ठाण्याबाबत सरकारने निर्णय घेतलेला नसला तरी स्थानिक पातळीवर हा निर्णय होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यात निर्बंध शिथील करताना ते कशा प्रकारे शिथील केले जाणार आहेत हे संबंधित पालिकांकडून आदेश जारी झाल्यावरच स्पष्ट .../२

## विमानतळाला 'दिबां'चे नाव देण्यासाठी ०९ ऑगस्टला मशाल मोर्चा; सर्वपक्षीय कृती समितीची आढावा बैठक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी ०९ ऑगस्ट अर्थात ऑगस्ट क्रांती दिनी जासई येथे मशाल मोर्चा काढण्यात येणार आहे. या संदर्भात उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठक झाली.



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीने पहिल्यांदा १० जून रोजी भव्य साखळी आंदोलन केले होते, तर २४ जून रोजी सिडको घेराव भव्य आंदोलन करण्यात आले. विमानतळाला 'दिबां'चे नाव द्यावे यासाठी भूमिपुत्रांच्या भावना तीव्र असतानाही राज्य सरकार याची दखल घेत नसल्याने कृती समितीने ऑगस्ट क्रांती दिनी म्हणजेच ०९ ऑगस्ट रोजी पुन्हा एकदा मशाल मोर्चाच्या माध्यमातून एल्गार पुकारला आहे. या संदर्भात रूपरेषा, नियोजन आदी विषयांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. या बैठकीस आमदार महेश बालदी, दशरथ भगत. जे. डी. तांडेल, सुरेश पाटील, संतोष केणे, राजेश गायकर, ज्येष्ठ पत्रकार दीपक म्हात्रे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## खा. सुनील तटकरे यांनी खा.सुप्रिया सुळे यांच्या सोबत घेतली अर्थमंत्री ना. निर्मला सीतारामन यांची भेट

### विमा कंपन्याचे पुरग्रस्त ग्राहकांना सहकार्य मिळण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

२२ जुलै २०२१ रोजी रायगड लोकसभा मतदारसंघात झालेल्या अतिवृष्टीमुळे दरडी कोसळण्यासह पुरस्थिती निर्माण झाली आणि हजारोंचे जनजीवन विस्कळित झाले. या पार्श्वभूमीवर रायगडचे खा. सुनील तटकरे यांनी खेड शहराच्या दौऱ्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरद पवार यांच्या कानावर व्यापारी वर्गाच्या विमा कंपन्या बाबतच्या अडचणी घातल्यानंतर आज दिल्लीत खा. सुप्रिया सुळे यांच्या सोबत केंद्रीय अर्थमंत्री ना. निर्मला सीतारामन यांची भेट घेऊन लेखी निवेदन दिले आहे.



रायगड लोकसभा मतदारसंघातील रायगड जिल्ह्यातील महाड, पोलादपूर आणि रत्नागिरी जिल्ह्यातील खेड व चिपळूण येथील व्यापारी वर्गाच्या दुकानातील माल मोठ्या प्रमाणात भिजून नुकसान झाले आहे. मात्र, विमा कंपन्यांकडून भरपाई मिळण्यासंदर्भातील पंचनामा होईपर्यंत पुराच्या पाण्यात भिजलेले अन्नधान्य व कपडे तसेच खाद्यतेल दुकानातून न हलविण्याचे तसेच सर्व स्टॉकची नोंद व सविस्तर पावत्यांची माहिती सादर करण्याच्या जाचक अटी व नियम घालण्यात आल्याने विमा कंपन्यांकडून पंचनामा होईपर्यंत प्रचंड दुर्गंधीला व अनारोग्याला सामोरे जावे लागणार असल्याचे समजून आले. यामुळे रायगड लोकसभा मतदारसंघाच्या दौऱ्यादरम्यान खा. तटकरे यांनी पक्षाध्यक्ष खा. शरद पवार यांच्या कानावर ही अडचण सांगून २००५ प्रमाणे खा. शरद पवार यांनी विमा कंपन्यांना सहकार्य करण्यास प्रवृत्त करण्याचे आवाहन केले. यावेळी खा. पवार यांनी सदर विमा कंपन्यांची यादी मागवून सहकार्य करण्याची ग्वाही दिली होती.

यानंतर आज दि.२ ऑगस्ट २०२१ रोजी रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी .../२

## रायगडच्या पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांच्या आढाव्यामुळे प्रतापगड परिसरातील ग्रामस्थांशी संपर्क पूर्ववत



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाटात २२ जुलै २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे संपूर्ण घाटरस्ता ठिक ठिकाणी दरडी कोसळून प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेल्या वाडा कुंभरोशी पर्यंतचा मार्ग ठप्प झाला. पुढे महाबळेश्वर पर्यंतचा घाटरस्ता देखील उद्ध्वस्त झाल्याने तब्बल आठवडाभर या गावाचा आणि परिसरातील लोकवस्त्यांचा संपर्क तुटला. सातारा जिल्हा प्रशासनाला या गावापर्यंत पोहोचता येणे केवळ अशक्य असल्याचे रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांना निदर्शनास आले आणि त्यांनी तात्काळ पोलादपूर येथील तहसील कार्यालयात आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रतिनियुक्तीवर असलेले पेणचे प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार यांना हा रस्ता मोकळा करण्याचे काम युध्दपातळीवर सुरू करण्यासंदर्भात आदेशवजा सुचना दिल्या.

पोलादपूर तालुक्यातील विविध दरडग्रस्त, अतिवृष्टीग्रस्त तसेच पुरग्रस्त गावांना सलग सहा दिवस भेटी देत असताना नियमितपणे ना. अदिती तटकरे यांनी या आंबेनळी घाटातील दरडी हटविण्याच्या कामाचा आढावाही घेतला. शनिवार, दि. ३१ जुलै रोजी अखेरीस पोलादपूर ते प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेल्या वाडा कुंभरोशी गावापर्यंतचा आंबेनळी घाटरस्ता मोकळा झाला.

रायगडच्या जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके व पेण उपविभागीय अधिकारी विठ्ठल इनामदार यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह प्रतापगडाच्या पायथ्याशी सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यातील .../२


# सुयोग्य पुढचे पाऊल

वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या पदवीपूर्व आणि पदव्युत्तर प्रवेशांसाठी होणाऱ्या केंद्रीय प्रवेश परीक्षांमध्ये यापुढे इतर मागासवर्गीय म्हणजे ओबीसी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विशिष्ट टक्केवारी राखीव ठेवण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा निर्णय स्वत:ही ट्वीट करून सर्वांना सांगितला आहे. हा निर्णय अपेक्षित आणि बराच काळ लांबला होता. त्याचे स्वागत करायला हवे. भारतात वैद्यकीय प्रवेश प्रामुख्याने दोन प्रकारे होतात. एक तर, राज्यांमधली वैद्यकीय महाविद्यालये आपापल्या पद्धतीने प्रवेश देतात. तेथील राखीव जागांची पद्धत याआधीच स्थिरावली आहे. मात्र, केंद्रीय प्रवेश परीक्षा या प्रामुख्याने केंद्रीय वैद्यकीय महाविद्यालये/विद्यापीठे, तसेच लष्करी वैद्यकीय महाविद्यालयांसाठी असल्या तरी या परीक्षांमध्ये उत्तम गुणांकन मिळविणाऱ्या कोणत्याही राज्यातल्या विद्यार्थ्याला इतर राज्यांमध्ये किंवा अर्थातच केंद्रीय संस्थांमध्ये प्रवेश मिळू शकतो. अशा मुला-मुलींचे अधिवास प्रमाणपत्र म्हणजे डोमिसाइल सर्टिफिकेट हा अशा प्रवेशामधला अडथळा ठरत नाही. या वैद्यकीय, दंतवैद्यकीय व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची जी केंद्रीय 'नॅशनल एलिजिबिलिटी कम् एन्ट्रन्स टेस्ट' (नीट) होते, तिला जवळपास १५ लाख मुले-मुली बसतात. राज्यांमधल्या कॉलेजांमध्ये पदवीपूर्व प्रवेशांसाठी १५ तर पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी ५० टक्के जागा या परीक्षांमधल्या गुणवंतांसाठी असतात. मात्र, या 'नीट' परीक्षांची जी तजवीज करण्यात आली, तीत भारतीय राज्यघटनेतील आरक्षणाच्या व्यवस्थेचा समावेशच नव्हता. अभयनाथ विरुद्ध दिल्ली सरकार असा खटला सर्वोच्च न्यायालयासमोर चालल्यानंतर २००७ मध्ये अनुसूचित जातींसाठी १५ आणि अनुसूचित जमातींसाठी साडेसात टक्के आरक्षण या केंद्रीय निवड यादीत असायला हवे, असा निकाल आला. या निकालाची पुढची तार्किक परिणती इतर मागासवर्गाचाही समावेश या आरक्षणात करणे, हीच होती. ती आता झाली आहे. मोदी सरकारने टाकलेले हे पाऊल म्हणजे पुढच्या आणि मुख्यत: उत्तर प्रदेशातील विधानसभेच्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून घेतलेला निर्णय आहे, अशी टीका लगेच सुरू झाली. तशी ती होणारच. मात्र, २००७ मधील सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आल्यानंतरच केंद्र सरकारने या वैद्यकीय 'नीट'मधील यशस्वी विद्यार्थ्यांपैकी २७ टक्के जागा केंद्रीय संस्थांमध्ये आरक्षित केल्या होत्या. याचा अर्थ, २००७ नंतर लष्करी किंवा केंद्रीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अनुक्रमे १५, ७.५० आणि २७ असे आरक्षण आले होतेच. मात्र, या परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना विविध राज्यांमधल्या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश देताना हे आरक्षण लागू झाले नव्हते. ते आता झाले आहे. हा निर्णय घेताना सरकारने 'नीट'मधील यशस्वी मुलांच्या राज्यांमधील वैद्यकीय प्रवेशांसाठी आता आर्थिक दुर्बल घटकाचाही समावेश केला आहे. ही टक्केवारी दहा असेल. या निर्णयांमुळे दर वर्षी ओबीसी वर्गातील सुमारे चार हजार मुलांना देशभरात लाभ होऊ शकेल. तसेच, अर्थदुर्बल वर्गातील सुमारे दीड हजार मुलांनाही देशभरातील वैद्यकीय महाविद्यालयांचे दरवाजे यापुढे उघडतील. देशभरात दर वर्षी ६० हजारांहून अधिक डॉक्टर तयार होतात. तो पाहता नव्या आरक्षणामुळे सुमारे दहा टक्के डॉक्टरांची भर या नव्या आरक्षणामधून पडू शकेल. आज देशभरातच आरक्षणाचा मुद्दा अनेक प्रकारे पुन्हा ऐरणीवर येतो आहे. महाराष्ट्रही त्यातून जातो आहे. अशा वेळी, निदान वैद्यकीय प्रवेशांमधली एक त्रुटी दूर होते आहे. खासदार अनुप्रिया पटेल यांनी हा मुद्दा अनेकदा मांडला होता. सुशीलकुमार मोदी यांनीही राज्यसभेत तो मांडला होता. काही दिवसांपूर्वीच भाजप व मित्रपक्षांच्या ओबीसी खासदारांनी पंतप्रधानांची भेट घेऊन ओबीसींना हे वैद्यकीय शिक्षणातील आरक्षण तातडीने मिळावे, असे निवेदन दिले होते. त्यानंतर लगेचच हा निर्णय झाला आहे. हा निर्णय योग्य असला, तरी त्यातून भाजपच्या एकंदरीत राजकारणाची दिशा लक्षात यावी. उत्तर प्रदेशातील निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून मोदींनी हा निर्णय घेतला, अशी टीका काँग्रेसने केलीच आहे. काँग्रेसने आजवर मागासवर्गासाठी काहीच केले नव्हते, असे प्रत्युत्तर भाजपने लगेच दिले. मात्र, हा निर्णय सरकारने कोणत्याही न्यायालयाच्या निकालाच्या आधीच घेऊन टाकला. याशिवाय, अनेकदा आरक्षणातून मिळणाऱ्या प्रत्यक्ष लाभापेक्षाही अशा निर्णयांमधून निर्माण होणारी लोकभावना ही कितीतरी व्यापक व अखेर न्याय झाला, असे समाधान वाटणारी असते. या निर्णयामुळे महाराष्ट्रासहित अनेक राज्यांमधील विविध प्रकारच्या आरक्षणासाठी लढा देणाऱ्या आंदोलकांच्या आशा पल्लवित झाल्या असतील. त्याही आरक्षणांच्या तुलनेने मोठ्या प्रश्नांकडे यापुढे डोळेझाक करून केंद्र सरकारला चालणार नाही.

# मोटारगाडी फसवणूक व अपहाराप्रकरणी दोन आरोपी अटकेत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोटार गाडी यांची फसवणुक, अपहार करणाऱ्या ०२ आरोपींच्या मुसक्या नेरूळ पोलिसांनी आवळल्या असून त्यांच्या अटकेमुळे ७ गुन्ह्यांची उकल करून ३१ चार चाकी वाहने किंमत दोन कोटी दहा लाख रूपये किमतीची मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.



पोलीस आयुक्त, विपीन कुमार सिंग, सह पोलीस आयुक्त, डॉ . जय जाधव, पोलीस उपआयुक्त सुरेश मेंगडे . परि - ०१ वाशी , सहा पोलीस आयुक्त भरत गाडे, तुर्भे विभाग, यांनी नागरीकांच्या फसवणुकीचे प्रमाणे वाढत असल्याने नमुद गुन्हे तात्काळ उघडकीस आणण्याच्या दिलेल्या सुचनांनुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाम शिंदे यांचे मार्गदर्शनानुसार पो.नि. सुनिल गवळी (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरणाचे सपोनि राजेंद्र घेवडेक, सपोनि सचिन मोरे व स्टाफ यांनी नेरूळ पोलीस ठाणे गुन्हा नोंद कं . २७६/२०२१ कलम ४२०,४०६ हा गुन्हा उघडकिस आणला आहे.

नमुद गुन्ह्यातील पाहिजे आरोपी यांनी फिर्यादी व इतर साक्षीदार यांची चार चाकी वाहने जास्तीचे भाड्याने मोठमोठ्या कंपनीत लावतो असे आमिष दाखवुन त्यांचेकडून त्यांची चार चाकी वाहने घेवुन पहिल्या एक दोन महिन्याचे भाडे देवुन त्यांच्या मार्फतीने आणखी इतर लोकांचे वाहने भाडे तत्वावर घेवुन नमुद सर्व वाहने तिहाईत व्यक्तीकडे गहाण ठेवून फसवणुक करून पळुन गेले होते. नमुद आरोपीतांचा गुप्त बातमीदार व तांत्रिक माहिती आधारे अनेक दिवस पाळत ठेवून अंधेरी मुंबई येथे सापळा रचुन छोलेलाल उर्फ राजेश शर्मा, वय -७४ वर्षे रा . खारघर ता पनवेल जि रायगड , मुळगांव- जौनपुर राज्य- उत्तर प्रदेश यास ताब्यात घेवून आरोपीताकडे तपास करून त्यांचा साथीदार नामे हरिषदास शिलोत्रे उर्फ पाटील , वय -४० वर्षे, रा. भिवंडी जि ठाणे , यास चेम्बुर मुंबई येथून ताब्यात घेवून अटक करून दोन्ही आरोपीतांकडे कौशल्यपुर्ण तपास करून अटक आरोपीतांनी फिर्यादी यांचेकडुन भाडेतत्वावर घेतलेली वाहने तिऱ्हाईत व्यक्तीकडे गहाण ठेवले असल्याचे आढळून आले नमुद एकुण ०२ कोटी १० लाख रूपये किमंतीचे एकुण- ३१ चार चाकी वाहने महाराष्ट्रातुन व परराज्यातुन जप्त करण्यात आलेली आहेत. नमूद आरोपींकडून नेरुळ पो स्टे , न्हावाशेवा पो स्टे मानखुर्द पो.स्टे खारघर पो.स्टे वाशी पो.स्टे उपरोक्त गुन्हयातील नेरूळ पो. स्टे कडील एकुण- ०८ चार चाकी वाहने किमंत - ७६,००,००० / न्हावाशेवा पो. स्टे एकुण- ०१ चार चाकी वाहने किमंत २,७०,००० / मानखुर्द पो.स्टे एकुण- ०१ चार चाकी वाहने किमंत ६,७०,००० / खारघर पो.स्टे एकुण -०४ चार चाकी वाहने किंमत २९,००,००० / वाशी पो. स्टे एकुण- ०७ चार चाकी वाहने किंमत ३०,००,००० / इतर साक्षीदार यांचे एकुण- १२ चार चाकी वाहने किंमत ९ ०,००,००० / भादवि ४२०,४०६ भादवि ४०६ भादवि ४०६ अशा प्रकारे आरोपीतांकडून उपरोक्त गुन्हयातील फसवणुक / अपहार केलेली १०० % मालमत्ता हस्तगत करून एकुण- ०७ फसवणुक, अपहाराचे गुन्हे उघडकीस आणुन दोन कोटी दहा लाख रूपयेची मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

याप्रकरणी वपोनि शाम शिंदे , पो. नि. गवळी ( गुन्हे ), सपोनि राजेंद्र घोडेवरकर, सपोनि सचिन मोरे, पो.हवा. झांजे , पो.ना.बिरारी, पो.ना. पाटील, पो. शि.सानप, पो.शि.इंगळे, पो.शि आव्हाड या तपास पथकाचे अभिनंदन केले आहे.

# सततच्या बदलणाऱ्या प्रशासनाच्या भूमिकेवर रेशन दुकानदारांची नाराजी

## संघटना लवकरच मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शासकीय परिपत्रकानुसार धान्यापासून कोणीही गरीब वंचित राहू नये याबाबत सखोल माहिती दिलेली आहे. परंतु प्रशासनाकडून अलिखीत व आपल्या मर्जीनुसार सततच्या बदलणाऱ्या भूमिकेनुसार अर्थ लावून प्रत्येकी वेळी बायामेट्रीक बाबत प्रश्न उपस्थित करून लाभार्थ्यांना मिळणारे धान्यांमध्ये अडचणी निर्माण करण्यात येत आहेत. त्यामुळे धान्य वाटपामध्ये दुकानदार व सर्वसामान्य रेशनकार्ड धारकांचा तोंडी संघर्ष होत आहे. यासाठीच रास्त भाव धान्य दुकान व किरकोळ रॉकेल विक्रेता वेल्फेअर असोसिएशन पनवेल संघटनेच्या नुकत्याच झालेल्या बैठकीमध्ये प्रशासनाच्या सतत बदलणाऱ्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली व लवकरच सर्वपक्षीय बैठक घेवून मोठा निर्णय घेणार असल्याचे जाहीर केले.

जागतिक कोरोना महामारी, पावसाळा, पुरपरिस्थिती तसेच ई-पॉज मशिनवर बायोमेट्रीक पद्धतीने दुकानदारांना धान्य वितरणात येणाऱ्या दैनंदिन अडचणी तसेच संभाव्य सणासुदीचे दिवस लक्षात घेता लाभार्थी धान्यापासून वंचित राहू नये यासाठी शासकीय वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शासनाच्या बायोमेट्रीक पद्धतीची व्यवस्थित माहिती उपलब्ध करून द्यावी. त्याचप्रमाणे धान्य वितरण करताना दुकानदारांना कोणताही त्रास होणार नाही, यासाठी मंजुर नियतनाप्रमाणे यादीसह लेखी परिपत्रक माहे ऑगस्ट पासून उपलब्ध करून देण्यात यावीत, अशी दुकानदारांची मागणी आहे. त्याचप्रमाणे शासनाने नेमलेल्या ठेकेदाराने द्वारपोच योजनेंतर्गत धान्य वाहतूक वाहनामध्ये वजन काटा उपलब्ध करून धान्याची गोणी वजन करून धान्य दुकानात पुर्ण वजनासह पोच करून देण्याची आवश्यकता असल्याचे संघटनेमार्फत देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# पूरग्रस्तांना मदत करताना सार्वजनिक व वैयक्तिक आरोग्याच्या साधनांना प्राधान्य द्यावे : निधी चौधरी

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

महाड व पोलादपूर मध्ये नुकत्याच आलेल्या महापुरा मध्ये महाड शहराबरोबरच पोलादपूर व महाड तालुक्यांमधील अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान झाले आहे . शासन , सामाजिक संस्था व अनेक स्वयंसेवी लोक पूरग्रस्त लोकांना मदत करत आहेत यामध्ये बऱ्याचदा गरज नसणाऱ्या वस्तूही देणगी स्वरूपात पूरग्रस्तांना मिळत आहेत सध्या पूरग्रस्तांना कशाप्रकारे मदत करायची हे जाणून घेण्यासाठी स्वदेस फाउंडेशने ग्राम विकास समितीसाठी डिजिटल स्वदेस अंतर्गत वेबिनार चे आयोजन करण्यात आले होते यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी पूरग्रस्तांना मदत करताना सार्वजनिक व वैयक्तिक आरोग्याच्या साधनांना प्राधान्य द्यावे असे आवाहन केले.

यावेळी बोलताना त्या पुढे म्हणाल्या की पूरग्रस्तांना मदत करताना वैयक्तिक स्वच्छतेसाठी नेलकटर, कंगवा, सॅनिटरी नॅपकिन, मच्छर अगरबत्ती व मच्छर पासून बचाव करणाऱ्या वस्तूंचे आवश्य कतेनुसार वाटप करावे. ताप ,थंडी,उलट्या येत असल्यास १२ वर्षा वरील सर्वांसाठी डॉक्ससीसीलाइन , १२ वर्षाखालील मुलांसाठी अमोक्सिसिलिन ,५ वर्षाखालील मुलांना हगवण,उलट्या येत असल्यास ओआरएस ( जलसंजीवनी) देणे गरजेचे आहे , घरगुती जलसंजीवनी तयार करण्यासाठी दीड चमचा मीठ ,सहा चमचा साखर व उकळलेले पाणी घ्यावे एकत्रित करून मिश्रण तयार करावे व पिण्यासाठी द्यावे.

पूरग्रस्तांना मदत करताना प्लास्टिकच्या बाटली मधून पाणी न देता १५ ते २० लिटर चे कॅन द्यावेत. ताप असल्यास कोविड टेस्ट करून घेणे गरजेचे आहे , अंगावर कोणत्याही प्रकारचा आजार काढू नये. पूरग्रस्तांना कोरोना झाल्यास त्यांना घरातच विलगीकरण करण्यात येईल व चांगल्या प्रकारची औषधे देण्यात येतील व दररोज पाठपुरावा करण्यात येईल असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी आपत्ती होऊ नये या संदर्भात कोणत्या प्रकारे काळजी घ्यायची याविषयी माहिती दिली व पूरग्रस्त गावांमध्ये निर्माण झालेल्या कचऱ्याची विल्हेवाट कशाप्रकारे लावायची याबत मार्गदर्शन केले. पूरग्रस्तांना संसाराला उपयोगी पडणारी भांडी, नवीन कपडे व स्वच्छतेस उपयोगी पडणारे सामानाचे वाटप करावे करण्यात यावे असे आवाहन केले.

पूरग्रस्तांना मदत केलेल्या १८ ग्राम विकास समितीने यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. जिल्हाधिकारी निधी चौधरी व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर किरण पाटील यांनी पूरग्रस्तांसाठी स्वदेस फाउंडेशन करत असलेल्या कामाचे कौतुक केले.

स्वदेस फाउंडेशन चे मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे यावेळी मार्गदर्शन केले व उपसंचालक तुषार इनामदार, प्रदीप साठे यांनी यावेळी पूरग्रस्तांना मदत करताना आलेले अनुभव व्यक्त केले, नीता हरमलकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## आदेश जारी; राज्यातील २२ जिल्ह्यांमध्ये निर्बंध शिथील

होणार आहे. पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अहमदनगर, बीड, रायगड आणि पालघर या ११ जिल्ह्यांमध्ये तूर्त सध्याचे लेव्हल तीनचे निर्बंध कायम राहणार आहेत. त्यानंतर मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि ठाणे वगळता अन्य २२ जिल्ह्यांमध्ये सोमवार ते शुक्रवार सर्व दुकाने आणि मॉल्स रात्री ८ वाजेपर्यंत सुरू ठेवता येणार आहेत. शनिवारी दुपारी तीन पर्यंतची वेळ असेल तर रविवारी अत्यावश्यक सेवांची दुकाने सोडून बाकी सर्व दुकाने बंद राहतील. व्यायाम, वॉकिंग, जॉगिंग आणि सायकलिंगसाठी सार्वजनिक उद्यानं आणि मैदानं खुली राहतील. सर्व शासकीय आणि खासगी कार्यालयं पूर्ण क्षमतेने सुरू ठेवता येतील. शिफ्टची रचना मात्र गर्दी टाळता येईल अशारितीने करावी लागेल. वर्क फ्रॉम होमला प्राधान्य देण्याचे धोरण कायम ठेवावे, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

जीम, योगा सेंटर्स, हेअर कटिंग सलून, ब्युटी पार्लर्स, स्पा इत्यादी एसी न वापरता ५० टक्के क्षमतेने सोमवार ते शुक्रवार रात्री ८ वाजेपर्यंत चालवता येतील. शनिवारी ही वेळ दुपारी तीनपर्यंत असेल तर रविवारी सेवा बंद ठेवावी लागणार आहे. त्याचवेळी चित्रपटगृहे, नाट्यगृहे आणि मल्टिप्लेक्स (मॉलमधील मल्टिप्लेक्सही) पुढील आदेशापर्यंत बंदच राहणार आहेत. धार्मिक स्थळेही तूर्त बंदच राहणार आहेत. सर्व रेस्टॉरंट्स ५० टक्के क्षमतेने सायंकाळी चार वाजेपर्यंत सुरू ठेवता येतील. कोविड नियम पाळून वीक डेजमध्ये ही मुभा असेल. वाढदिवसाचे कार्यक्रम, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम, निवडणूक, निवडणूक प्रचार, सभा, निदर्शने, मोर्चा यांना मनाई कायम ठेवण्यात आली आहे. या सर्व जिल्ह्यांत रात्री ९ ते सकाळी ५ वाजेपर्यंत विनाकारण फिरण्यावर निर्बंध असतील, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

## अर्थमंत्री ना. निर्मला सीतारामन यांची भेट

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेतली. यावेळी झालेल्या चर्चेत टाटा एआयजी, एसबीआय जनरल, मणिपाल सिग्ना, आदित्य बिर्ला, आयसीआयसीआय लोम्बार्ड, बजाज एलियान्झ, मॅक्स बुपा, युनायटेड, ओरिएंटल, नॅशनल, न्यू इंडिया, एचडीएफसी, कोलामंडलम एमएस आदी विमा कंपन्यांचे ग्राहक या नैसर्गिक आपत्तीकाळात बाधित झाल्याने खा. तटकरे व खा. सुप्रिया सुळे यांनी अर्थमंत्री ना. निर्मला सीतारामन यांना संबंधित विमा कंपन्यांनी ग्राहकांना सर्वतोपरी सहकार्य करून पुन्हा व्यवसाय धंदे सुरू करण्याकामी उभारी देण्याचे आवाहन केले. यावेळी संबंधित विमा कंपन्यांकडून ग्राहकांना निर्धारित रकमेच्या ५० टक्के रक्कम विनाविलंब देण्याची मागणीही केली.

सद्यस्थितीत, माल आणि मालमत्ता यांची सकृतदर्शनी १०० टक्के हानी झाली असताना विमा कंपन्यांकडून केवळ अन्याय्यरित्या रक्कम दिली जाऊ नये यासाठी खा. तटकरे यांनी रायगड लोकसभा मतदारसंघात गेल्या काही महिन्यांत निसर्ग व तोक्ते ही दोन वादळं तसेच नुकताच झालेला विनाशकारी पाऊस एवढेच कारण नसून कोविड -१९ च्या पार्श्वभूमीवर असलेला लॉक डाऊन विचारात घेऊन विमा कंपन्यांकडून ग्राहकांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे निर्देश देण्यात यावेत, असे आवाहन केंद्रीय अर्थमंत्री ना. निर्मला सीतारामन यांना केले आहे.


## प्रतापगड परिसरातील ग्रामस्थांशी संपर्क पुर्ववत

वाडा कुंभरोशी येथे संपर्क तुटलेल्या गावकऱ्यांना भेटून त्यांना १ हजार २०० अन्नधान्य किट दिले. तसेच रायगड जिल्ह्यातील पोलादपूर येथून आणखी १० हजार तयार जेवणाचे पॅकेट्स प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेल्या या गावातील गावकऱ्यांसाठी पाठविले. प्रतापगडाच्या पायथ्याशी ३५ गावे असून सुमारे २ हजार कुटुंब आहेत. अतिवृष्टीमुळे प्रतापगड पायथा ते महाबळेश्वर रस्ता मागील ७-८ दिवसापासून बंद असल्यामुळे या गावकऱ्यांशी कुठल्याही प्रकारचा संपर्क होत नव्हता. मात्र रायगड जिल्हा प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तेथे जाऊन रस्ता मोकळा करण्याचे काम केले आणि संपर्क तुटलेल्या गावांशी पुन्हा संपर्क साधण्यात यश मिळविले.

या ग्रामस्थांना भेटण्यासाठी राज्याच्या पर्यटन, उद्योग,विधी व न्याय राज्यमंत्री व रायगडच्या पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांनी खास तातडीने दौरा केला. प्रतापगडाच्या पायथ्याशी वाडा कुंभरोशी येथील कमानीपर्यंतचा ठिकाणी दरडी हटविण्यात आलेल्या रस्त्याचे भरपावसात पायी चालत अवलोकन केले. यावेळी प्रतापगडाच्या पायथ्याशी कमानी पर्यंत युवा राज्यमंत्री ना. अदिती तटकरे यांना उत्साह आणि उमेदीने पायी चालत पाहणी करताना पाहून ग्रामस्थांना विशेष अप्रुप वाटले. अदिती ताईंसोबत फोटो काढून आठवडाभराचा संपर्क तुटल्याने आलेला कंटाळा क्षणार्धात दुर होत ग्रामस्थांमध्ये उत्साह संचारला होता. सर्वत्र ना. अदितीताई तटकरे यांचे आपुलकी व जिव्हाळ्याने कौतुक होताना दिसत होते. रायगडच्या पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांच्यामुळे प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेल्या गावांतील लोकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

## मा.उपमहापौर विक्रांत पाटील यांच्या पाठपुराव्याने

# वडाळे तलाव रस्त्यावर थर्मोप्लास्ट गतिरोधक लावण्यात आले



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नव्याने सुशोभित करण्यात आलेल्या वडाळे तलावाच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात आले आहे.

नवीन पनवेल कडून जुन्या पनवेल आणि अमरधामच्या कडे जाणारा हा रस्ता सुस्थितीत असल्याने वाहन चालक व बाईक स्वार वेगाने गाड्या चालवत असल्याची बाब काही सतर्क नागरिकांनी कार्यक्षम नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली.

या रस्त्यावर दुर्घटना होण्याची संभावना लक्षात घेऊन विक्रांत पाटील यांनी त्वरीत महापालिका अधिकाऱ्यांशी बोलून या रस्त्यावर थर्मोप्लास्ट गतिरोधक लावण्यास सांगितले व त्यासंबंधी पत्र सुद्धा दिले.

महापालिकेने विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन त्वरित कारवाही करत या रस्त्यावर थर्मोप्लास्ट गतिरोधक लावून घेतले.नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी नेहमीच तत्पर असणारे नगरसेवक विक्रांत पाटील यांना नागरिकांनी धन्यवाद दिले.


**जाहीर नोटीस** अॅड. जितेंद्र सचदेव

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात.**
**दिवाणी चौकशी अर्ज ६०७/२०२१ सि. ८ / ड**
**श्रीमती. फतीमा अब्दुल अजीझ पटेल वगैरे १...... अर्जदार**
**जहर अहमद अब्दुल अजीझ पटेल**
**दोघे राहणार सदनिका नं. ९०२ सी विंग, कृष्णा टॉवर को. ऑ. हौ. सो. लि., सेक्अर ५ ई, कंळबोली, ता. पनवेल**
**वि.**
**कोणीही नाही ... सामनेवाला**

ज्या अर्थी अर्जदार यांनी पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश व. स्तर यांचे न्यायालयात कै. अब्दुल अजीझ हुसेन मिया पटेल यांचे वारस म्हणून वारस दाखला मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे. कै. अब्दुल अजीझ हुसेन मिया पटेल यांचे मृत्यू दि. ०३/१२/२०२० रोजी रोजी राहते घरी निधन झाले झालेला आहे. श्रीमती. फतीमा अब्दुल अजीझ पटेल व श्री. जहुर अहमद अब्दुल अजीझ पटेल यांचे मालकीची व ताबेकब्जा वहिवाटीच्या खालील वर्णनाच्या मिळकती सिडकोने संपादित केल्या आहेत.

| अनु क्र. | मिळकतीचे वर्णन |
|---|---|
| १. | मौजे. तलोजा, ता. पनवेल, जि. रायगड येथील घर नं. १३२, क्षेत्रफळ - ३२३.०५ चौ.मी. |
| २. | मौजे. पेंधर, ता. पनवेल, जि. रायगड येथील प्रॉपर्टी नं. ६१४ अ, क्षेत्रफळ - १९४ चौ.मी. रेस्टॉरंट च्या जागेसोबत. |
| ३. | मौजे. पेंधर, ता. पनवेल, जि. रायगड येथील सर्वे नं. ९७, क्षेत्रफळ - १५१० चौ.मी. ही शेतजमीन. |
| ४. | मौजे. पेंधर, ता. पनवेल, जि. रायगड येथील सर्वे नं. ९९, क्षेत्रफळ - ४३३० चौ.मी. ही शेतजमीन |
| ५. | सी - विंग, क्रिष्णा टॉवर को. ऑ. हौ. सौ. लि., सिडको ऑफिस च्या समोर, सेक्टर ५ इ, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड मधील सदनीका नं. १०१ क्षेत्रफळ ४९.८१५६ चौ.मी. (चटई क्षेत्र) त्यासोबतचे ४४.०९९ चौ.मी इतके क्षेत्रफळ असलेला टेरेसचा भाग. |
| ६. | सी - विंग, क्रिष्णा टॉवर को. ऑ. हौ. सौ. लि., सिडको ऑफिस च्या समोर, सेक्टर ५ इ, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड मधील सदनीका नं. १०२ क्षेत्रफळ ६८.५५१ चौ.मी. (चटई क्षेत्र) त्यासोबतचे ७०.७४३ चौ.मी इतके क्षेत्रफळ असलेला टेरेसचा भाग. |
| ७. | देवरत्न बिल्डींग, प्लॉटनं. १००, सेक्टर १४, तलोजा पंचनंद, ता. पनवेल, जि. रायगड येथील गाळानं. १२ क्षेत्रफळ २८.५१३ चौ.मी.(चटई क्षेत्र). |
| ८. | देवरत्न बिल्डींग, प्लॉटनं. १००, सेक्टर १४, तलोजा पंचनंद, ता. पनवेल, जि. रायगड येथील गाळानं. १३ क्षेत्रफळ २८.५१३ चौ.मी.(चटई क्षेत्र). |
| ९. | देवरत्न बिल्डींग, प्लॉटनं. १००, सेक्टर १४, तलोजा पंचनंद, ता. पनवेल, जि. रायगड येथील गाळानं. १४ क्षेत्रफळ २८.५१३ चौ.मी.(चटई क्षेत्र). |
| १०. | देवरत्न बिल्डींग, प्लॉटनं. १००, सेक्टर १४, तलोजा पंचनंद, ता. पनवेल, जि. रायगड येथील गाळानं. १५ क्षेत्रफळ २८.५१३ चौ.मी.(चटई क्षेत्र). |
| ११. | निलकंठ हाईट्स, प्लॉट नं. ४३ अ/४४ अ, सेक्टर १६, रोडपाली, कलंबोळी, ता. पनवेल, जि. रायगड येथील गाळा नं. २० क्षेत्रफळ ७६.३७६ चौ.मी. (चटई क्षेत्र). |
| १२. | सुरज रेसिडन्सी, प्लॉट नं. १५, सेक्टर १० इ, कलंबोळी, नवी मुंबई, येथील गाळा नं. ९ क्षेत्रफळ ६०.९०३ चौ.मी. (चटई क्षेत्र). |
| १३. | सिडको लि. च्या १२.५ टक्के योजनेनुसार दिनांक. १५/०३/२०१२ रोजीच्या इरादापत्रानुसार इदारीत करण्यात आलेला तळोजा-VI , ता. पनवेल, जि. रायगड येथील प्लॉट नं. १ ब, सेक्टर ७, क्षेत्रफळ ५८५० चौ.मी अंदाजे. |
| १४. | मौजे - ओवे, ता. पनवेल, जि. रायगड येथील सर्वे नं. ९५/१, युनिट केस नं.६० हया भुखंडाचे संपादनाच्या मोबदल्यात सिडको लि. च्या १२.५ टक्के योजनेनुसार वाटप करण्यात येणारा भुखंड वा फायदे. |
| १५. | मौजे - पेंधर, ता. पनवेल, जि. रायगड येथील सर्वे नं. ११३, युनिट केस नं.१०१ हया भुखंडाचे संपादनाच्या मोबदल्यात सिडको लि. च्या १२.५ टक्के योजनेनुसार वाटप करण्यात येणारा भुखंड वा फायदे. |
| १६. | मौजे - तळोजा पंचनंद, ता. पनवेल, जि. रायगड येथील सर्वे नं. २३६/१, युनिट केस नं. ११ हया भुखंडाचे संपादनाच्या मोबदल्यात सिडको लि. च्या १२.५ टक्के योजनेनुसार वाटप करण्यात येणारा भुखंड वा फायदे. |
| १७. | मौजे - चौल, ता. पनवेल, जि. रायगड येथील सर्वे नं. ४६/२च, युनिट केस नं. ६५/५ हया भुखंडाचे संपादनाच्या मोबदल्यात सिडको लि. च्या १२.५ टक्के योजनेनुसार वाटप करण्यात येणारा भुखंड वा फायदे. |
| १८. | मौजे - चौल, ता. पनवेल, जि. रायगड येथील सर्वे नं. ४६/२च, युनिट केस नं. ८५ हया भुखंडाचे संपादनाच्या मोबदल्यात सिडको लि. च्या १२.५ टक्के योजनेनुसार वाटप करण्यात येणारा भुखंड वा फायदे. |

सदर मिळकतीपैकी काही मिळकतींच्या संपादनाच्या मोबदल्यात साडेबारा टक्के भुखंड मिळणार आहे.

कै. अब्दुल अजीझ हुसेन मिया पटेल यांचे नाव कमी करुन सदर भूखंडवर त्यांचे वारस १) श्रीमती. फतीमा अब्दुल अजीझ पटेल २) श्री. जहुर अहमद अब्दुल अजीझ पटेल वारसांची नावे त्यांच्या जागी सिडको दप्तरी रेकॉर्डवर येणे गरजेचे झालेले आहे. तसेच कै. अब्दुल अजीझ हुसेन मिया पटेल यांच्या इतर मालकीच्या व ताबेकब्जातील मिळकती हया त्यांचे वारसांचे नावे येणे गरजेचे झालेले आहे. त्याकामी दिवाणी न्यायालयाकडून वारसदाखल्याचा निवाडा जाहीर करुन घेणे गरजेचे व आवश्यक झालेले आहे.

सबब सदर कारणाकरीता अर्जदार यांनी मे. दिवाणी न्यायालयात वारसदाखला मिळण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर मिळकतीचे वारसाहक्काबाबत कोणाची हरकत, अधिकार अथवा वारसा असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत आपल्या हरकती या न्यायालयाकडे योग्य त्या पुराव्यासह सादर कराव्यात.

सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून योग्य त्या मुदतीत कोणाच्या हरकती न आल्यास, कोणाचीही हरकत नाही असे समजून वारस दाखला देण्यात येईल. मागाहुन आलेल्या कोणत्याही हरकतीची विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ०३ ऑगस्ट २०२१ आमच्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यासह दिले.

सही/- कनिष्ठ लिपीक दि. न्या. व. स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा. अधिक्षक दि. न्या. व. स्तर, पनवेल


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पेट्रोल पंपावर मोजमापात फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनजागृती ग्राहक मंच, पनवेलचे तालुका उपाध्यक्ष सुभाष फडके यांनी रविकांत पेट्रोलियम, खांदा कॉलोनी,पनवेल, यांच्याबाबत केलेल्या तक्रारीनुसार वैध मापनशास्त्र यंत्रणेने तपासणी केली असता ग्राहकांना पेट्रोल कमी मिळत असल्याचे सिद्ध झाले. सदर पेट्रोलपंपावरील ३ नोझल बंद करण्यात आले आहेत. याबाबत पेट्रोल पंप मेनेजरसोबत बोलने केले असता मशीनला जो टोलरंस आहे तो लिमिटमध्ये असल्याने फेरपड़तालनी करून शासनाला त्याचे पैसे भरून तिन्ही नोझल पुन्हा सुरू केले असल्याचे सांगितले.

काही दिवसांपूर्वी सुभाष फडके हे रविकांत पेट्रोलियम इंडियन ऑइल, खांदा कॉलनी सेक्टर ८, पनवेल, या पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्यास गेले असता त्याना पेट्रोल पंपाचे मापामध्ये शंका आली म्हणून ते घेत असलेले पेट्रोल हे शासकीय शासन मान्य मापटयाने मापूनच मिळावे म्हणून पेट्रोल पंपाचे कर्मचारी व मॅनेजर यांच्याकडे मागणी केली. त्यांनी सुभाष याना पेट्रोल मापट्याने मापून मिळणारच नाही. आपण कोण आहात? आपले आय कार्ड दाखवा? व याबाबत आपण कुठेही तक्रार करू शकता असे उघडपणे सांगितले व असभ्य वर्तन केले असल्याचे सुभाष फडके यांचे म्हणणे आहे. पनवेल परिसरात अशा डिझेल, पेट्रोल विक्रीमध्ये ग्राहकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत आहे. रविकांत पेट्रोलियम इंडियन ऑइल, खांदा कॉलनी येथे अचानक धाडसत्र करून डिझेल व पेट्रोल विक्रीचे मोजमापाचा निरीक्षण व परीक्षण करून त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी जनजागृती ग्राहक मंच,पनवेलचे तालुका उपाध्यक्ष सुभाष फडके यांनी केली होती. त्यानुसार अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग वैध मापनशास्त्र यंत्रणा यानि तपासणी केली असता पाच लिटरच्या प्रमाणित कोनीकल मापाने व पिपेटने सलग तीन वेळा डिलिव्हरी तपासली असता अनुक्रमे नोझल एन २ पेट्रोल १५ मिली, १० मिली, आणि १० मिली कमी आढळली. यावेळी ठराविक मुदतीत या संदर्भातील त्रुटी दूर कराव्यात असे वैधमापन शास्त्र यंत्रणेने कळवले आहे.

## शिवसेना द्रोणागिरी शहर शाखेच्या प्रयत्नाने द्रोणागिरी परिसरात बस थांबे

**दै.रायगड नगरी । उरण**

द्रोणागिरी नोड परिसरात बस थांब्याच्या ठिकाणी बस थांब्याचे फलक लागावेत यासाठी शिवसेना द्रोणागिरी शहर शाखेने सिडको कार्यालय, छ्चचढ कार्यालय येथे पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्याला आता यश आले आहे. शिवसेना द्रोणागिरी शहर शाखेच्या सततच्या पाठपुराव्या मुळे तसेच सिडकोचे अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्याने,नवी मुंबई परिवहन सेवा (छ्चचढ )च्या प्रयत्नाने महत्वाच्या ठिकाणी बस थांब्यांचे फलक लावण्यात आले आहेत.यामुळे परिसरातील ग्रामस्थ,प्रवाशी वर्गांने समाधान व्यक्त केले आहे. सिडको कार्यालय ,नवी मुंबई परिवहन सेवाच्या सर्व कर्मचारी अधिका-यांचे शिवसेना द्रोणागिरी शहर शाखेच्या वतीने शाखाध्यक्ष जगजीवन भोईर यांनी आभार मानले आहे.शिवसेनेच्या माध्यमातून झालेल्या या कामाचे सर्वत्र कौतुक होत आहे.प्रवाशांच्या सुख सुविधेसाठी व होणारी गैरसोय टाळण्यासाठी शिवसेनेच्या माध्यमातून लवकरच बस थांब्यांच्या ठिकाणी बसशेड उभारण्यात येणार असल्याची माहिती जगजीवन भोईर यांनी दिली.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


## पनवेलमधील २ मुलींना मिळाले राष्ट्रीय बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये यश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलमधील २ मुलींनी २५ जुलै ते ३१ जुलै दरम्यान हरियाणाच्या सोनीपत येथे आयोजित ०४ व्या बीएफआय राष्ट्रीय बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले होते. कु योगिनी पाटील ५२ किलो वजन गटात खेळली आणि महाराष्ट्रासाठी रौप्य पदक जिंकले. तिने तिच्या प्राथमिक आणि उपांत्य फेरीत मध्य प्रदेश, बंगाल आणि दिल्लीच्या बॉक्सर्सचा पराभव केला. अंतिम सामन्यात ती हरियाणा कडून गुणांवर हरली.

कु मधुरा पाटील ५४ किलोमध्ये खेळली आणि क्वार्टर फायनलमध्ये हरियाणाकडून गुणांवर हरली. तिच्या प्राथमिक फेरीत तिने पहिल्या फेरीत ओरिसा बॉक्सरचा पराभव केला होता. दोन्ही बॉक्सर्स खेलो इंडियासाठी पात्र झाले आहेत. जे फेब्रुवारी २०२२ मध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत. दोन्ही मुलींना एमपीएसए बॉक्सिंग क्लबमध्ये अद्वैत शेंबवणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी ऑलिम्पियन अर्जुन पुरस्कार विजेते मनोज पिंगळे यांचे विशेष प्रशिक्षण मिळत आहे.

# काँग्रेस पक्ष्याच्या पुढाकाराने माथेरानची मिनीबस सेवा अखेर नेरळ खांड्यात उपलब्ध

**दै.रायगड नगरी । माथेरान**

अनेक संघर्षाची कडवी आव्हाने पेलत माथेरान करांच्या जवळपास चार दशकांपासून कर्जत ते माथेरान मिनीबस सेवेचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी काँग्रेसचे तत्कालीन नगराध्यक्ष मनोज खेडकर यांना शासनदरबारी पाठपुरावा करावा लागला होता आणि अखेरीस त्यांनी नागरिकांच्या साथीने ११ ऑक्टोबर २०११ मध्ये ही सेवा उपलब्ध करून दिली होती. त्यावेळेस कर्जत नेरळ (खांडा ) मार्गे माथेरान असा प्रवास सुरू होता परंतु एसटी आगाराच्या गलथान कारभारामुळे ही बस कर्जत वरून सुटल्यानंतर नेरळ येथील हायवेवर उभी करून प्रवाशांची ससेहोलपट करीत होते.



माथेरानच्या अनेक प्रवाशांना नेरळ येथून हायवेवर येण्यासाठी ऑटोरिक्षाचा आधार घेऊन यावे लागत होते त्यामुळे ही बाब खूपच खर्चिक बनली होती. याकामी स्थानिक लोकांनी अनेकवेळा कर्जत आगाराला निवेदने सुध्दा दिली होती त्यास या आगाराने थातुरमातुर उत्तरे देऊन पळवाटा काढल्या होत्या. याकामी काँग्रेस पक्षाच्या महिला आघाडी प्रमुख वर्षा सुनील शिंदे यांनी आज दि. २ ऑगस्ट रोजी आपल्या महिला कार्यकर्त्यांना सोबत घेऊन थेट कर्जत आगारात आपला मोर्चा नेला शेवटी या आगाराचे प्रमुख शंकर यादव यांनी ही रास्त मागणी मान्य करून या अधिकारी वर्गाने आजपासून नेरळ खांडा येथे मिनीबस नेण्यासाठी चालक वर्गाला सूचना दिल्या आहेत त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

यावेळी वर्षा शिंदे यांच्या सोबत कामिनी शिंदे, अर्चना कदम, सुहासिनी दाभेकर आदी महिला उपस्थित होत्या. नव्याने महिला आघाडीच्या अध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारल्या नंतर नागरिकांची ही महत्वपूर्ण समस्या मार्गी लावल्या बद्दल या टीमचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर,नगरसेवक शिवाजी शिंदे माजी नगरसेवक संतोष लखन यांनी या आघाडी च्या महिलांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## सोशल मिडियावरील व्हायरल व्हिडीओची दखल घेत ना.आदिती तटकरे पोहोचल्या कोंडीवते पुरग्रस्त गावांमध्ये



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

२२ जुलै २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे विस्कळीत झालेले महाड आणि पोलादपूर तालुक्यातील जनजीवन पुर्वपदावर येत असताना सोशल मिडिया वर कोंडीवते या २००५च्या दरडग्रस्त गावातील कौचाली मोहल्यातील वाहून गेलेल्या घरासमोर इम्रान कौचाली या तरुणाने तयार केलेला व्हिडिओ सोशल मिडियावरून व्हायरल झाला. रायगडच्या पालकमंत्री ना अदिती तटकरे यांच्या पर्यंत हा व्हिडिओ पोहोचल्यावर त्यांनी तातडीने या कोडीवते गावाची माहिती घेऊन रविवारी सायंकाळी उशिरा या गावाला भेट दिली.

२२, जुलै रोजी सावित्री नदीच्या पात्रालगतच वसलेल्या कोंडीवते गावातील कौचाली मोहल्यातील इम्रान कौचाली याने शुक्रवारी एक व्हिडीओ व्हायरल केला. सोशल मिडिया वर व्हायरल झालेल्या या व्हिडीओची दखल रायगडच्या पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांनी घेतली. कोंडीवते हे गाव २००५ च्या अतिवृष्टी, महापूर व भुस्खलनामधील बाधित गांव आहे. येथील पुनर्वसन वसाहतीत यावेळी चक्क सात फुटांपेक्षा अधिक पुराचे पाणी शिरले. पालकमंत्री ना.तटकरे यांनी प्रथम पुनर्वसन वसाहतीमध्ये जाऊन माहिती घेतली तेथून कौचाली मोहल्याकडे जाऊन तेथील तरुण व बुजुर्ग लोकांसोबत चर्चा केली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते अब्दुल हक खलफे यांनी आवर्जून उपस्थित राहून कौचाली मोहल्ल्यातील समस्या मांडण्यासाठी इम्रान कौचाली याला साथ दिली.

वाहून गेलेल्या घरातील एक व्यक्ती वाहून गेल्यामुळे प्रथम त्याची नोंद बेपत्ता म्हणून करण्यासाठी यावेळी पालकमंत्री ना तटकरे यांनी निर्देश दिले. ग्रामस्वच्छता व अन्य सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासह जिओलाजिकल सर्व्हे करण्यात येऊन लवकरच कोंडीवते गावाबाबत योग्य निर्णय नियोजन पुर्वक घेण्यात येईल, अशी ग्वाही यावेळी पालकमंत्री ना. तटकरे यांनी दिली.

## सुरक्षा रक्षकांचा पगार थकविल्याप्रकरणी उलवे मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी सेक्युरिटी एजन्सीला दिला दणका

**दै.रायगड नगरी । उरण**

उलवे शहर परिसरातील विमानतळ बाधित क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या ५० हुन अधिक सुरक्षा रक्षकांचा पगार एका सेक्युरिटी एजन्सीने दोन महिन्यांपासून थकवला होता. या तरुणांनी कंपनी प्रशासनाला वेळोवेळी संपर्क करून देखील हि एजन्सी पगार देण्यास टाळाटाळ करत होती. परंतु येथे काम करणाऱ्या कु.अमोल गायकवाड यांनी मनसेचे कु. चिराग कोळी यांकडे संपर्क केला असता त्यांनी तातडीने याबद्दल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उपाध्यक्ष आणि मराठी कामगार सेनेचे अध्यक्ष महेश जाधव आणि स्थानिक मनसे पदाधिकाऱ्यांकडे याबद्दल समस्या मांडली.

यावेळी मनसे सरचिटणीस अनिकेत ठाकुर, सचिव मनोज कोळी, वहाळ पंचायत समिती अध्यक्ष कल्पेश कोळी यांच्या नेतृत्वाखाली गव्हाण विभाग उपाध्यक्ष प्रितम तांडेल, कोंबडभुजे शाखाध्यक्ष चिराग कोळी, गणेशपुरी उपशाखाध्यक्ष सुनिल कोळी आणि इतर पदाधिकाऱ्यांनी कंपनीकडे थकवलेल्या पगाराबद्दल बोलणी सुरु करून अगदी दोन दिवसातच थकीत पगार सुरक्षा रक्षक तरुणांना मिळवून दिला. यावेळी मनसे पदाधिकाऱ्यांनी सेक्युरिटी एजन्सीच्या कार्यालयात धडक देऊन यापुढे तरुणांचे पगार थकवु नये आणि त्यांना कामामध्ये कसल्याही प्रकारचा त्रास देऊ नये याबद्दल सूचना केल्या. अन्यायाला वाचा फोडल्या प्रकरणी कामगारांनी मनसेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांचे आभार मानले.




## दत्ता कांबळे यांच्या वाढदिवशी वाहतूक पोलिसांना रिफ्लेक्टर जॅकेटचे वाटप

### वाहतूक पोलिसांना १०५ जॅकेटचे वाटप

**दै.रायगड नगरी । पेण**

सध्या कोरोनाचे संकट सुरू असून या संकटात योद्धा म्हणून काम करणाऱ्या पोलीस योद्धांनी सुद्धा स्वतःची काळजी घेणे गरजेचे आहे. महामार्ग पोलीस हे रात्री अपरात्री रस्त्यावर असतात मात्र रात्रीच्या अंधारात होणाऱ्या अपघातामुळे अनेकांना आपला जीव गमवावा लागतो. याचा विचार करून पेण येथील सामाजिक कार्यकर्ते दत्ता कांबळे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त महामार्ग वाहतूक पोलिसांना १०५ रिफ्लेक्टर जॅकेटचे वाटप केले.



महामार्गावरील अपघातात जखमींना घटनास्थळी तेथील पोलीस पोहचण्या अगोदर तातडीने हॉस्पिटलमध्ये दाखल करण्याच्या उद्देशाने अप्पर पोलीस महासंचालक (वाहतूक) डॉ.भूषण कुमार उपाध्याय यांच्या संकल्पनेतून मार्च २०२१ पासून महाराष्ट्रात हायवे मृत्युंजय दूत तयार करण्यात आले आहेत.

मात्र रात्री-अपरात्री महामार्गावर सेवा देणाऱ्या याच पोलिसांना बेधुंद वाहन चालकांमुळे अपघातात नाहक आपला जीव गमवावा लागतो. त्यामुळे सदर वाहन चालकांना वाहतूक पोलिस लांबूनच दिसण्यासाठी पेण येथील सामाजिक कार्यकर्ते दत्ता कांबळे उर्फ डिके यांनी त्यांच्या ३३ व्या वाढदिवसानिमित्त वक्रतुंड मित्र मंडळ पेण तर्फे महामार्ग सुरक्षा रायगड विभागातील पोलिसांना १०५ रिफ्लेक्टर जॅकेटचे वाटप करण्यात आले.

यावेळी पोलीस निरीक्षक गौरी मोरे, वक्रतुंड मित्र मंडळ संस्थापक दत्ता कांबळे, राजू कांबळे, सचिन म्हात्रे, जयेश पाटील, रोहन पाटील, ओंकार डाकी, स्वप्नील पाटील, अनिकेत पाटील, महेश म्हात्रे आदी उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज श्रमिक महासंघ रिक्षा चालक मालक रिक्षा स्टॅन्डचे उद्घाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली हायवे यथे छत्रपती शिवाजी महाराज श्रमिक महासंघ रिक्षा चालक मालक रिक्षा स्टॅन्डचे उद्घाटन शिवसेना सल्लागार बबनदादा पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले.

यावेळी फलकाचे सुद्धा अनावरण करण्यात आले.

या कार्यक्रमास डी एन मिश्रा कळंबोली शहर प्रमुख आणि शिवसेना युवा सेना पदाधिकारी रिक्षा-चालक मालक उपस्थित होते. दरम्यान समस्थ रिक्षा चालकांचा सन्मान करण्यात आला.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : मुंगोशी, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतींच्या ७/१२ उतारी सदरी १) श्री.विजय राजेंद्रप्रसाद गुप्ता, २) श्री.ओमप्रकाश सत्यनारायण अग्रवाल, ३) श्री.निखील कमलकुमार जालान, ४) श्री.अखील कमलकुमार जालान, ५) श्री.दिनेश अमथालाल शहा, ६) श्री.विशाल गुप्ता, ७) आशा विजय गुप्ता, ८) विवेक विजय गुप्ता यांची नावे नमूद असून सदरची मिळकत त्यांच्या मालकी हक्कात व ताबेकब्जात असल्यामुळे सदरहू मिळकत ही आमच्या अशिलांनी विकत घेण्याची ठरविलेली आहे. तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता आमचे अशिलांच्या वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत, सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : मुंगोशी, ता.पेण, जि.रायगड**

| मौजे | गट क्र./ उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| मुंगोशी | १५ | ०७-४५-१०<br>पो.ख. ०३-१५-९०<br>एकूण क्षेत्र १०-६१-०० | १३.४४ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेली सदर मिळकतीमध्ये कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपला हक्क व हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे, अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजण्यात येईल. त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत असे गृहीत धरण्यात येईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०२/०८/२०२१

**सही/-**
**(सागर एस. जगे)**
**वकील**
**गाळा नं.८, श्री लक्ष्मी को.ऑप.हौ.सोसा.,**
**टिळक रोड, पनवेल-४१०२०६, जि.रायगड**
**मोबा नं.८७०२०३५८०५**



अॅड.अनिरुद्ध तुळसणकर

### जाहीर नोटीस

मे.जिल्हा न्यायाधिश, पनवेल रायगड यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.३७/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१३/०८/२०२१

श्रीमती.कांचन धिरज कोळी
वय : ३२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी कु.सानिका धिरज कोळी यांचा खालील मिळकती संदर्भात अज्ञान पालक म्हणून घोषित करून मिळणेकरिता मा.न्यायालयात हिंदू मायनॉरिटी अॅण्ड गार्डीयनशिप अॅक्ट, १९५६ चे कलम ८ (२) (अ) अर्ज दाखल केलेला आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन

| नोड | भूखंड क्रमांक | सेक्टर | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| उलवे | ७८ | १८ | १०४९.८२ |

अर्जदार यांचे पती कै.धिरज गोपिनाथ कोळी यांचे मृत्यूपश्चात अर्जदार श्रीमती.कांचन धिरज कोळी आणि कुमारी सानिका धिरज कोळी यांस भूखंड विकास करारनाम्याप्रमाणे वर नमूद भूखंडावर बांधण्यात आलेल्या इमारतीमधील खाली नमूद केल्याप्रमाणेच्या निवासी सदनिका वाटप करण्यात आलेल्या आहेत.

| अनु क्र. | निवासी सदनिकांचे क्रमांक | क्षेत्र चौ.फूट चटई | ज्या व्यक्तीचे लाभांत सदनिका हस्तांतरीत / वाटप केली आहे त्याचे नाव |
|---|---|---|---|
| १ | ३०१ | ७००.६५० | अजित गोपिनाथ कोळी |
| २ | ४०१ | ७००.६५० | कांचन धिरज कोळी<br>सानिका धिरज कोळी |
| ३ | २०२ | ८६६.६९६ | शेवंताबाई गोपिनाथ कोळी<br>अरुणा नारायण कोळी<br>मंदा परशुराम कावळे<br>मिना गोपिनाथ कोळी |

वर नमूद मिळकती संदर्भात अर्जदार यांनी कु.सानिका धिरज कोळी यांचे अज्ञान पालक असल्याचा दाखला मिळण्याकरिता सदरचा अर्ज मा.न्यायालयात दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांस पालकत्वाचा दाखला देणेबाबत कोणाचीही हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत हरकत सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदाराकडून कायदेशीर साक्षीपुरावे नोंदवून अर्जदारास पालकत्वाचा दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.३०/०७/२०२१ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

**सही/-** — **क.लिपीक** — **जिल्हा न्याया.पनवेल**
**कोर्टाचा शिक्का**
**सही/-** — **सहा.अधिक्षक** — **जिल्हा न्याया.पनवेल**



Shri. M.M Rao
Adv.Prakash Choudhary

### PUBLIC NOTICE

**IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.) PANVEL AT PANVEL**

Civil M.A. No. 829/2021
Exh. 8/D
Next Date : 1/09/2021

In the matter of issue of HEIRSHIP CERTIFICATE of the deceased Mr.Jitendra Kisan Mokal who expired on 20th April 2021 at Kamothe, Navi, Mumbai AS PER PROVISIONS contained In Sec 2 of the Bombay Regulation No.VIII of 1827

1) Smt. LALITA JITENDRA MOKAL
Age: 44 years, Occupation: Housewife
2) Mr. JAYDEEP JITENDRA MOKAL
Age: 23 years, Occupation: service.
3) Ms. RUTUJA JITENDRA MOKAL
Age: 19 years, Occupation: student
4) Master. OMKAR JITENDRA MOKAL
Age: 17 years Occupation: Student
Through mother and natural Guardian
Smt. Lalita Jitendra Mokal
5) Smt Parvati Kisan Mokal
Age: 66 years, Occupation: Housewife
All residents of 266, Targhar Navin Gali
Vithal Temple, Panvel Dist.Raigad — Applicants

That Late Mr. JITENDRA KISAN MOKAL who is the husband of the Application No.1 and father of Applicant No.2 and 3, 4 and son of Applicant No.5 expired on 20 the April, 2021 at Kamothe, Navi Mumbai.

The descriptions of the of the properties in the name of the deceased are as under.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

**Plot No.139, Sector-25, Pushpak Node Taluka Panvel District-Raigad admeasuring area of 230 sq.mtrs**

Whereas the above named applicant has filed Misc. Application for Heirship Certificate under Bombay Regulations VIII of 1827, in the Court of Civil Judge (S.D.) Panvel.

You the members of public are hereby given notice to appear in the court of Civil Judge (S.D.) Panvel, in person or by pleader duly instructed and to file your say/Objections, if any, within 30 (Thirty) days from the date of publication of this public notice, failing which the said application will be heard presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under the hand and seal of the court this 30 day of july, 2021

**Sd/- Jr.Clerk Civil Judge (S.D.) Panvel** — Court Seal — **Sd/- Asst.Superintendent Civil Judge (S.D.) Panvel**

# शेकापचा ७४ वा वर्धापन दिन तळा येथे मोठ्या दिमाखात साजरा

**दै.रायगड नगरी । तळा**

शेतकरी कामगार पक्षाचा ७४ वा वर्धापन दिन तळा पक्ष कार्यालयात मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. जेष्ठ कार्यकर्ते तथा माजी चिटणीस गोविंद शेठ भोईर यांच्या हस्ते लालबावटा फडकावून मानवंदना देण्यात आली. व यानंतर सभा घेण्यात आली.

यावेळी व्यासपीठावर माजी चिटणीस गोविंदशेट भोईर, तालुका चिटणीस धनराज गायकवाड, युवा नेते तथा रायगड जिल्हा बँक संचालक ज्ञानेश्वर भोईर, महमंद परदेशी, चंद्रकांत (परीट) तळकर, युवानेते लहू चव्हाण, दिपक रसाळ, कानू विचारे, बाबू शिंदे, मुकुंद धामणकर उपस्थित होते. प्रथमतः कोरोना महामारीत पक्षातील जेष्ठ पुढारी, आमदार व गणपतराव देशमुख कार्यकर्ते, दिवंगत झाले त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शेतकरी कामगार पक्षाचा वर्धापन दिन प्रतिवर्षी २ ऑगस्ट रोजी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो परंतु अजूनही कोरोनाचे संकट टळले नसल्याने




जिल्हाचिटणीस अँड आस्वाद पाटील यांनी तालुका कार्याचे ठिकाणी शासनाच्या नियमांचे पालन करून साजरा करण्याचे आदेश देण्यात आले असून त्याप्रमाणे तालुक्यात या निमित्ताने साजरा करण्यात आम्हाला मनापासून आनंद होत आहे. त्यामुळे तालुक्यातील पक्षावर प्रेम करणारे, निष्ठावंत कार्यकर्ते, युवा पिढीचे पक्षाबद्दलचा आदर निदर्शनास आला. पक्षाचे कार्य उद्देश उद्दीष्ट विस्तृतपणे प्रास्ताविक ज्ञानेश्वर भोईर यांनी सांगितले. शेतकरी कामगार पक्ष हा शेतकरी कष्टकरी करणाऱ्याचा पक्ष असून शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असते. अनेक चळवळी सहभागी होऊन न्याय मिळवून दिला आहे.

रायगड जिल्हा परिषदेत मोठ्या प्रमाणात विकासासाठी निधी उपलब्ध असून विरोधीपक्ष तळा गाळापर्यत पोहोचवत नाहीत. तो निधी खर्च करण्याची ताकद हि शे.का.प.मधेच आहे. असे धनराज गायकवाड यांनी सांगितले. शेकापचा जन्म ब्रिटिशांच्या अन्याय विरोधातून झाला. ब्रिटीशांची गुलामगीरी १९४७ साली संपुष्टात आली. २ ऑगस्ट १९४७ साली काही नेत्यांनी काँग्रेसच्या दडपशाहीला झुगारून शेतकरी कामकरी संघ केशवराव जेधे, भाऊसाहेब राऊत शंकरराव मोरे, दत्ता देशमुख, तुळशीदास जाधव अशा आमदार मंडळी व सहकारी नी स्थापन केला आणि पार्लमेंटमध्ये शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला. आजचा वर्धापनदिन एका अर्थाने शेतकऱ्यांचा आहे. त्याकाळापासून ना गो पाटील, दत्ता पाटील, प्रभाकर पाटील आणि पंडीत शेट पाटील सर्व मंडळी रायगड जिल्ह्यात शेतकरी कामगार पक्षाची धुरा आजपर्यंत सांभाळत आ-हेत. असा इतिहास किशोर पितळे पत्रकार यांनी देऊन ७५ वा. (अमृतमहोत्सव) वर्धापन दिन जिल्ह्यात दणक्यात साजरा करण्यात यावा अशी विनंती करून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला तालुक्यातील मजगांव, मांदाड वरळ,कुडा भागा-तील कार्यकर्ते उपस्थितीत पहीलाच वर्धापन दिन दिमाखात साजरा केला.

# संक्षिप्त...

## शिक्षक मैत्री समूहातर्फे पूरग्रस्तांना मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । उरण**

महाड -पोलादपूर तालुक्यावर आलेल्या अस्मानी संकटाच्या काळात कोकणवासीयांच्या मदतीला शिक्षक मैत्री समूहाच्या माध्यमातून शिक्षकांनी एक महिना पुरेल इतक्या किराणा सामानाचे किट व बिसलेरी बॉक्स देऊन खारीचा वाटा देऊन शिक्षक मैत्री समूहाने आपले कर्तव्य बजावले आहे!

पोलादपूर तालुक्यातील चरई गावाला जोडणारा पूल पुरात वाहून गेल्यांनातर या गावाचा इतर जगाशी संपर्क होत नव्हता. पुराने बऱ्याच गावकऱ्यांची घरे वाहून गेली ,घरातील सर्व किराणा सामान आणि इतर जीवनावश्यक गोष्टी खराब झाल्याने चरई गावावर उपासमारीची वेळ आली होती. अशा परिस्थितीत शिक्षक मैत्री समूह व एकता सामाजिक संघटनेच्या माध्यमातून केलेल्या मदती बद्दल गावकऱ्यांनी आभार मानले.

पोलादपूर शहरातील नदी किनारच्या दुर्गम भागातील पुरग्रस्तांना मदत पोचणे महत्वाचे होते अशा ठिकाणी व महाड शहरात देखील गरजवतांना यावेळेस मदत करण्यात आली तसेच अशा नैसर्गिक आपत्तीच्या काळात शिक्षक मैत्री समूह कोकणवासीयांच्या नेहमीच सोबत असेल असे आश्वासन समूहाचे सदस्य अमित पाटील,अजित जोशी,विद्याधर गावंड, प्रशांत परदेशी,अविनाश म्हात्रे, देवेंद्र गावंड, शेखर म्हात्रे,सचिन गावंड यांच्या मार्फत देण्यात आले. या कार्यात पोलादपूरचे सामाजिक कार्यकर्ते अनिकेत दरेकर, पत्रकार देवेंद्र दरेकर यांनी मोलाचे सहकार्य केले.

## सोन्याची माळ घेऊन चोरटे पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पोलीस असल्याचे सांगून कामोठे येथे ६० वर्षीय महिलेची २० ग्रॅम वजनाची सोन्याची माळ घेऊन चोरटे पसार झाले आहेत.

कामोठे, सेक्टर ३५ येथील अरुणा मसुरकर ह्या देव दर्शनासाठी पायी चालत चालल्या होत्या. या वेळी एक इसम पोलीस आहे असे सांगून त्यांच्याजवळ आला व कालच या ठिकाणी चाकुचा धाक दाखवून शिक्षिका महिलेचे सोन्याचे दागिने काढून नेल्याचे त्याने सांगितले. यावेळी तुम्ही तुमचे दागिन घालून फिरू नका नाहीतर तुमचे सोने देखील घेऊन जातील असे सांगून तुमच्या अंगावर घातलेले सोने काढून ते तुमच्या पिशवीत घालून ठेवा असे त्या इसमाने सांगितले. त्यांच्यावर विश्वास ठेवून अरुणा यांनी त्यांचे दागिने काढले व त्यांच्या पिशवीत ठेवले. यावेळी त्या इसमाने पिशयीची गाठ मारून देतो असे सांगितले व २० ग्रॅम वजनाची सोन्याची माळ घेऊन तो निघून गेला. त्याचा पाठलाग केला असता हे दोन्ही अनोळखी इसम फसवणूक करून चैन घेऊन निघून गेले. कामोठे पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

## कोकण रेल्वे एम्प्लॉईज युनियन आणि रेल्वे कामगार सेना होणाऱ्या निवडणुकीत दणदणीत विजय संपादन करणार : दिवाकर देव



**दै.रायगड नगरी । माणगाव**

कोकण रेल्वेची २०२१ची निवडणूक ही चुरशीची होणार असून या निवडणुकीत कोकण रेल्वे एम्प्लॉईज युनियन आणि शिवसेना पुरस्कृत रेल कामगार सेना यांची युती असून या युतीचा बहुमतांनी विजय संपादन करणार असल्याचे जनरल सेक्रेटरी दिवाकर देव (बाबी )यांनी प्रतिपादन केले.

या निवडणुकीमध्ये कोकण रेल्वे एम्प्लॉईज युनियनला ऑल इंडिया sc/st असोसिएशन, ऑल इंडिया एम्प्लॉईज युनियन, पॉईंटमन असोसिएशन, ट्रक मन असोसिएशन यांचा पाठिंबा आहे. रोहा रेल्वे स्टेशन पासून ते ठुकूर रेल्वे स्टेशन पर्यंत २६ बूथ असून जवळ जवळ ५ हजार मतदार संख्या आहे.नॅशनल रेल्वे मजदूर युनियन यांनी मागील काही वर्षांपासून कामगारांची फसवणूक केली आहे. या निवडणुकीत नॅशनल युनियन चा पराभव करून हाकलून देणार. तसेच या निवडणुकीत विजय झाला की कामगारांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मिळवून देणार.२४०० रुपयांची वाढ मिळवून देणार, कामगारांना त्यांची हक्काची पेन्शन मिळवून देणार अशी प्रतिक्रिया दिवाकर देव यांनी व्यक्त केली.

सन २०१४ पासून लाल बावटा नेतृत्वानी कायम अत्याचार अन्याय केला असून कोकण रेल्वेचे खाजगीकरण करण्याचा डाव हाणून पडणार असून कामगारांची दिशाभूल करीत आहेत. सदरची निवडणूक ही ४ व ५ ऑगस्ट रोजी होणार असून नॅशनल रेल्वे मजदूर युनियन चा दारुण पराभव करणार. या वेळी जॉईंट जनरल सेक्रेटरी नरेंद्र शिंदे, ऑल इंडिया sc /st असोसिएशन कोषध्यक्ष मिलिंद गायकवाड, गजानन गायकर, जयसिंग देशमुख, दत्तात्रेय तेलंगे, संतोष शेलार, भरत शर्मा, मल्हारी बटाटे, अच्युत पाटील, सुनील गांधे, प्रशांत सुतार व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## काशिद पुलाचे आ.महेंद्र दळवी यांच्या हस्ते उद्घाटन

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरूड तालुक्यातील अलिबाग मुरूड रस्त्याला जोडणारा पूल ११ जुलैच्या अतिवृष्टीमुळे पडून मुरूड मधील विजय चव्हाण या व्यक्तीचा मृत्यू ही झाला होता. पूल तुटल्यामुळे अलिबाग, मुंबई इत्यादी ठिकाणचा संपर्क तुटला होता. सदर पुलाचे काम आमदार महेंद्र दळवी यांच्या पाठपुराव्याने त्वरित करण्यात आले, शासनातर्फे अलिबाग येथील सार्वजनीक बांधकाम विभागाला सदर पुलाचे काम जलद करण्याचे आदेश दिले होते. आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते सदर पुलाचे उदघाटन करण्यात आले असून दुचाकी व छोट्या चारचाकी वाहनांना वाहतुकीस परव-ानगी देण्यात आली असून दोन दिवसात अवजड वाहनांना परवानगी मिळेल असे सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सांगण्यात आले.

उदघाटन प्रसंगी मुरूड पंचायत समितीचे उपसभापती चंद्रकांत मोहिते,उसरोली गटाच्या रायगड जिल्हा परिषद सदस्या राजश्री मिसाळ,उपजिल्हाप्रमुख तथा कोर्लई सरपंच प्रशांत मिसाळ, मुरूड तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, अलिबाग तालुका प्रमुख राजा केणी, महिला तालुका संघटक शुभांगी करडे, जगीता कोटकर-हासपाटील यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. काशीद पुलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांनी मुसळधार पाऊस असताना देखील पुलाचे काम उत्कृष्टरित्या पूर्ण केले असल्याने त्यांना शासनाच्या वतीने धन्यवाद देऊ तितकेच कमी आहे असे प्रतिपादन अलिबाग मुरुडचे आमदार महेंद्र दळवी यांनी काशीद पूल उद्घाटनप्रसंगी कार्यक्रमात केले.



## पाली शहरातील खड्ड्यांकडे कोणी लक्ष देईल का? पालीकरांचा संतप्त सवाल

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातील पाली येथील मुख्य बाजार पेठेतील रस्त्यावर खड्डेच खड्डे दिसत असल्याने रस्त्यात खड्डे कि खड्ड्यात रस्ता असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. पाली शहरातील खड्डयांकडे कोणी लक्ष देईल का ?असा संतप्त सवाल पालीकर विचारत आहेत.

पाली शहरात जागोजागी मोठमोठे खड्डे पडले असताना मात्र प्रशासन मात्र सुस्त होऊन याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसत आहे. खड्ड्यांमुळे येथील नागरिकांना नाहक त्रास सहन करावी लागत असतानाही प्रशासन मात्र डोळ्यावर पट्टी बांधून बसली आहे.पाली हे शहर अष्टविनायकाचे स्थान असलेल्या बल्लाळेश्वर तीर्थक्षेत्र असणाऱ्या पाली शहराच्रया रस्त्याची पुरती दुरवस्था झाली आहे. गावातील मुख्य रस्त्याचे अंतर्गत रस्त्यावर ठिकाणी भलेमोठे खड्डे पडले आहे. पावसाला त्या खड्ड्यातून मार्ग काढणे जोखमीचे झाले आहे. त्यामुळे नागरिकांचे वाहनचालक पुरते मेटाकुटीला आले आहेत. येथील स्टेट स्टेट बँक पासून गांधी चौक, महावीर मार्ग ते थेट गणेश मंदिरापर्यंत या रस्त्याची दुरावस्था झाली आहे.



आगरआळी, सावंतआळी, रामआळी ते मधल्याआळी पर्यंत रस्ता, हटाळेश्वर चौक ते भोईआळी ते मिनिडोर स्टँन्ड ते बस स्थानक रस्त्याचे भल्यामोठ्या खड्ड्यांनी अक्षरश चाळण झाली आहे. पडणाऱ्या पावसात खड्ड्यात पाणीच पाणी झाल्याने काही वेळातर वाहनांमुळे नागरिकांच्या अंगावर पाणी उडते. त्यामुळे नागरीकांचे रस्त्यांनी चालणे मुश्किल झाले आहे.

पाली शहरातील खड्ड्यांकडे कोणी लक्ष देईल का? असा संतप्त सवाल पालीकर जनता विचारत आहे.

## भर पावसात सुध्दा माथेरान नगरपरिषद सफाई कामगार कार्यरत

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानचा परिसर बावन्न किलोमीटर असून महत्वाच्या ठिकाणी जिथे नागरिकांसह पर्यटकांची नेहमीच वर्दळ असते त्याठिकाणी नगरपरिषदेच्या माध्यमातून बाराही महिने रस्त्यांची स्वच्छता राखली जात आहे.

नगरपरिषदेतील काही सफाई कामगार हे कायमस्वरूपी कर्तव्यावर आहेत तर बहुतांश कामगार हे घनकचरा व्यवस्थापन ठेकेदारामार्फत आपली कामे चोखपणे बजावत आहेत. या सर्वांच्या सहकार्याने अनेकदा नगरपरिषदेला स्वच्छता अभियानात पारितोषिके प्राप्त झाली आहेत. सफाई कामगारांना निविदेच्या माध्यमातून ठेकेदाराकडून चांगल्या प्रकारे रोजगार उपलब्ध होत असला तरीसुद्धा त्यांना पुरेशा सुविधा निर्माण करून देणे सुध्दा तितकेच महत्वाचे आहे. उन्ह-ाळी हिवाळी अन पावसाळी या तीनही ऋतूमध्ये सर्व कामगार कार्यरत असतात विशेषतः कचरा वेचक महिला सुध्दा घरोघरी जाऊन कचरा संकलन करीत आहेत तर उन्हाळ्यात गावातील गटारात पडलेला सुका कचरा गोळा करून डंपिंग ग्राउंडवर जमा केला जातो. पावसाळ्यात अनेक ठिकाणी पेव्हर ब्लॉक रस्ते खूपच चिकट होत असल्याने त्यावर ब्लिचिंग



पावडर टाकून रस्ते चालण्या योग्य केले जातात. यात महिला कामगारांचा मोलाचा सहभाग असतो. तर इथे घोड्यांची संख्या मोठया प्रमाणावर असल्याने घोड्यांची विष्ठा उचलण्याची कामे ठेकेदाराचे कामगार नित्यनेमाने करीत आहेत. खूपच दुर्गंधीची कामे आजही इथे मानवी पध्द-तीने केली जातात. या सर्व कामगारांना वेळच्या वेळी त्यांच्या कामाचा मोबदला त्याचप्रमाणे नियमानुसार पी. एफ. ची रक्कम मिळणे अपेक्षित असते परंतु काही वेळा ही रक्कम दिली जात नाही. स्वच्छतेची कामे करतांना योग्य ते साहित्य त्याचप्रमाणे पावसाळ्यात रेनकोट, बूट अशाप्रकारे अत्यावश्यक सुविधा पावसाळा सुरू झाला की ताबडतोब देणे गरजेचे असते परंतु अनेकदा पावसाळा सुरू होऊन दोन महिने झाले तरीसुद्धा या महत्वाच्या बाबींची पूर्तता केली जात नाही त्यासाठी संबंधित अधिकारी वर्गाने,ठेकेदाराने कामगारांच्या आरोग्याची सुध्दा काळजी घेणे अनिवार्य आहे.हेच कामगार गा-वाचे स्वच्छता दूत असून या सर्वांच्या कार्यतत्परते मुळेच स्वच्छता अभियानात दरवर्षी नगरपरिषदेला चांगल्या प्रकारे पारितोषिके प्राप्त होत आहेत.

## नगरसेवक नितीन पाटील यांच्याकडून महाड पूरग्रस्तांना मदत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजपाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आवाहनानुसार पनवेल महानगरपालिकेचे नगर-सेवक व जाणीव एक सामाजिक संस्थाचे संस्थापक नितीन जयराम पाटील यांच्या कडून महाड येथील पूरग्रस्तांना तांदूळ, दोन डाळी, तेल, मीठ, साखर, चहा पावडर, अशी शिधासामुग्री देण्यात आली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पनवेल नगरी यांच्या माध्यमातून ही सामुग्री सदर ठिकाणी पाठविण्यात आली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक महाड व चिपळूण येथे अत्यंत दुर्गम भागात जाऊन शिस्तबद्ध पद्धतीने काम करीत आहेत.

## ना.आदिती तटकरे यांच्या हस्ते पेण येथील जिते पूरग्रस्तांना अन्नधान्य किट वाटप

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अतिवृष्टी, दरड पडणे व पूरपरिस्थिती यामुळे जिल्ह्यातील पोलादपूर, महाड, कर्जत, पेण व इतर तालुक्यातील अनेक गावातील कुटुंबावर संकट ओढवले आहे. शासन पातळीवर त्यांना मदत निश्चितच मिळेलच परंतु त्यांना तातडीने आधार मिळावा, यासाठी सुनील तटकरे प्रतिष्ठान तर्फे जिल्ह्यासह पेण मधील जिते पूरग्रस्तांना अन्नधान्य किट वाटप करण्यात येत आहे. झालेल्या नुकसानीच्या पंचनाम्याची कार्यवाही पूर्ण होऊन तहसिलदार यांच्यामार्फत यादीतील कुटुंबाना ही मदत दिली जाणार आहे. अशा संकटात धैर्याने उभे राहून आपण सर्वांनी उभारी घेतली पाहिजे असे प्रतिपादन पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी जिते येथे अन्नधान्य किट वाटप कार्यक्रमात केले.



सुनील तटकरे प्रतिष्ठान तर्फे जिल्ह्यातील पूरग्रस्तांना अन्नधान्य किट वाटप करण्यात येत आहे. त्यानुसार पेण येथील पूरग्रस्तांना पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते अन्नधान्य किट वाटप करण्यात आले.

यावेळी पेण तहसिलदार डॉ.अरुणा जाधव, दादर सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोविंदराव पाटील, नरेंद्र ठाकूर, उदय जवके, दयानंद भगत, जितेंद्र ठाकूर, जिल्हा नियोजन समिती सदस्य बंड्याशेठ पाटील, विकास पाटील, चैताली पाटील, सुचिता चव्हाण, नगरसेविका वसुधा पाटील, वडखळ सरपंच राजेश मोकल, नथुराम म्हात्रे, मधुकर रूठे, मळेघर सरपंच शरद पाटील, श्री.तांबोळी, अनिलशेठ पाटील, सुधर्मा सकपाळ, धर्मेंद्र म्हात्रे, प्रभाकर ठाकूर, अशोक डंगर, अमित भगत, मालती म्हात्रे आदींसह शासकीय अधिकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

## शिक्षक बांधवांचा पूरग्रस्तांना मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । उरण**

महाड येथील महापुरात पूरग्रस्त झालेल्या गावात प्रत्यक्षात जाऊन पूरग्रस्त भागात ३३ कुटुंबाना जीवनउपयोगी वस्तु वितरित करण्यात आल्या.त्यामध्ये चटई,ब्लँकेट, टॉवेल, खाण्यासाठी बिस्किटे, चॉकलेट आदी वस्तूंचा समावेश होता.

पूरग्रस्त भागांत मदत करण्यासाठी वेगवेगळ्या शहरातील शिक्षक वृंद एकत्रित येऊन सामाजिक बांधिलकी जपत आपल्या एकत्रित संकल्पनेतुन खारीचा वाटा म्हणून ३३ कुटुंबामध्ये किट वाटप करण्यात आले.तसेच इतरांनाही आपल्या माध्यमातून मदत करण्याचे आव्हान केले आहे.

बाधित झालेल्या महाड मधील नागरिकांना योग्य मदत मिळवून देण्यासाठी तेथील शिक्षक प्रदीप पवार यांनी योग्य नियोजन करून त्यांच्या समवेत प्रमोद झावरे पनवेल, उमेश म्हात्रे अलिबाग, संतोष पाटील सारडे, प्रविण पाटील उरण, राम गेंड चेंबूर, ज्ञानेश आलदर पनवेल, बाळकृष्ण कोठेकर डोंबिवली, विनोद घोरपडे कोपरखैरणे, कविता पाटील पनवेल, सायली पाटील मॅडम उरण, नरेंद्र म्हात्रे अलिबाग, संतोष पाटील कोप्रोली उरण, प्रतिभा कासारे पनवेल, सुप्रिया पाटील पनवेल, मानसी पोटे पनवेल, गणेश कडू पनवेल, दौलत कोयंडे पनवेल, सुनील चंदनशिवे पनवेल, श्रीकांत सुतार पनवेल, विनोद तुपलोंढे पनवेल इत्यादी शिक्षकांनी मदतीचा हात पुढे केला.